UpLift
Enriching lives of the poor...together

अपलिफ्ट इंडिया असोसिएशन - स्वाभिमान द्वारा

# मनोगत

मूल्य : रुपये २

वर्ष २
अंक ४

१४ नोव्हेंबर: बालदिन

## संपादकीय...

ऑक्टोबरच्या उन्हाची तलखी अचानक कमी होऊन जेव्हा पहाटेचा गारवा नकळत प्रवेश करतो, तेव्हा येते दिवाळी! प्रत्येकाने हा अनुभव घेतला असेल की दिवाळीच्या सुमारास वातावरणात अचानक असा काही फरक पडतो की नकळत आपण त्याला दिवाळीची हवा म्हणतो! उन्हाच्या चटक्यांनी भाजून निघाल्यावर येणारी ही दिवाळीची हवा आपली मरगळ दूर करते.

आपण कधी विचार केलाय का की हे सण का साजरे करतात? तुम्ही म्हणाल की देवासाठी, धर्मासाठी! पण त्याबरोबरच हे सण साजरे करण्यामागचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे आपले मन, आपल्या कुटुंबातील वातावरण ताजे ठेवणे. माणसाच्या मनाला नेहमी काहीतरी नवं हवं असतं. रोजच्या कामातून बदल हवा असतो. म्हणूनच हे सण आपल्याला नवा उत्साह देतात.

दिवाळी ही तर सणांची राणीच. अनेकानेक दिव्यांची, फटाक्यांची, खाद्यपदार्थांची रास असणारी ही दिवाळी काय सांगते? तर अंधारातून तेजाकडे जा, अज्ञानातून ज्ञानाकडे जा, दु:खाकडून सुखाकडे जा, बेकारीतून रोजगाराकडे जा, दारिद्र्यातून समृद्धीकडे जा, रोगराईकडून आरोग्याकडे जा....आणि या सगळ्यासाठी शरीराचा थकवा, मनाची मरगळ झटकून टाका...पहाटे उठून, स्वच्छ होऊन दीप पेटवा. सर्व प्रकारच्या आपत्तीचा नाश करून सुख-समाधानाची रांगोळी काढा...

मनोगतच्या सर्व वाचकांना ही दिवाळी सुखाची व आनंदाची जावो ही

## रोजचं गिऱ्हाईक टिकवलं




लेखन: शैलेन्द्र देशमाने
प्रफुल्लता हेन्द्रे
विद्या भोसले

(हरबाची त्याच्या भाजीच्या दुकानात साफसफाई चालू आहे)
गिऱ्हाईक : वांगी कशी दिली?
(हरबा लक्ष देत नाही)
गिऱ्हाईक : वांगी कशी दिली पावशेर?
हरबा : थांबा की जरा, दुकान तर लावू दे.
गिऱ्हाईक : अन् मेथी कशी दिली?
हरबा : अहो, खालीवर करू नका खराब होते भाजी. वरची पाहिजे तर घ्या! पाच रुपये गड्डी
गिऱ्हाईक : भेंडी कशी दिली?
हरबा : ७ रुपये पावशेर. निवडायची नाही अजिबात. ताजी आहे.
गिऱ्हाईक : शेजारी तर सहा रुपये आहे.
हरबा : घ्या की मग तिकडेच! कशाला आला इकडे?
गिऱ्हाईक : १ रुपयाची कोथिंबीर द्या चला.
हरबा : १ रुपयात काही नाही येत.
गिऱ्हाईक : बर मग आलं द्या दोन रुपयाचं.
(केरबा जाता जाता हरबाच्या दुकानात येतो)
हरबा : (आलं देतो आणि केरबाकडे बघून पुटपुटतो) काय पण गिऱ्हाईक मिळतं एक एक..
गिऱ्हाईक : दोन रुपयाचं एवढंच आलं?
हरबा : मग तुम्हाला काय शेत देऊ का दोन रुपयात.
गिऱ्हाईक : हे घ्या पैसे. तुमचं शेत बघायला येतंय कोण पुन्हा इथे?
हरबा : सुट्टे द्या. (केरबाकडे बघत पुटपुटतो) दोन रुपयाचं आलं घेतलं अन् दहा रुपयाची नोट!
गिऱ्हाईक : काय बाई, भाजी विकायलाच ठेवली आहे ना?
हरबा : बाई! तुम्हाला घ्यायची तर घ्या ना उगाच भवानीच्या वेळेला वाद नका घालू.
(गिऱ्हाईक आलं तिथेच ठेवून निघून जाते.)
केरबा : काय रे हरबा. असं का केलंस.
हरबा : मग काय तर. १ रुपयाचा माल आणि चौकशी किती?
केरबा : मग काय झालं त्याला. गिऱ्हाईकासाठीच तर ही भाजी ठेवली आहे ना? आता तुझं हे गिऱ्हाईक गेलं की कायमचं!
हरबा : जाऊ दे गेलं तर. इथं काय कमी आहे गिऱ्हाईकाला..
केरबा : एक लक्षात ठेव हरबा, उद्या तुझ्या अशा वागण्यामुळे हा नेहमीचा गिऱ्हाईक त्या शेजारच्या दुकानात जाईल आणि तुला हात हलवत बसायला लागेल. ते बघ त्या शेजारच्या दुकानात गर्दी वाढायला लागली.
हरबा : खरंच की. माझ्या हे लक्षातच नाही आलं.
केरबा : मग लक्षात ठेव. रोजचा गिऱ्हाईक हीच तुझी संपत्ती आहे. त्याला गमावू नकोस. त्याचं हसत मुखाने स्वागत कर. ओळखीच्या लोकांची विचारपूस कर. आपणहून त्याला माल निवडायला मदत कर. माल नसला तरी लगेच आणून द्यायचा प्रयत्न कर. मग बघ कशी गर्दी होते तुझ्या दुकानात! आणि हो गर्दी झाली तरी कुणालाही परत जाऊ देऊ नको.
हरबा : धन्यवाद केरबा मी नक्कीच प्रयत्न करेन.

# बलवीरच्या कुटुंबाची कहाणी...

### एका रात्रीची मजा



बलवीर एक रात्र काही महिलांबरोबर मजा म्हणून घालवतो. दारूच्या नशेत तो निरोध वापरत नाही...

### बलवीर कोणालाच सांगत नाही



काही दिवसांनीच त्याला गुप्तांगांवर भयंकर खाज व जळजळ जाणवू लागते. तो याविषयी कोणालाच सांगत नाही.

### बलवीरच्या बायकोलाही त्रास होतो



बलवीरच्या बायकोलाही गुप्तांगांतून स्त्राव होतो व जळजळ जाणवू लागते. ती हे बलवीरला सांगते.

### चांगल्या मित्राचा सल्ला



बलवीर त्याच्या जुन्या मित्राला त्याला होणारा त्रास सांगतो. मित्र त्याला डॉक्टरांकडे जाण्याचा सल्ला देतो.

### डॉक्टर एच्. आय्. व्ही. ची तपासणी करण्याचा सल्ला देतात.



डॉक्टर बलवीरला गुप्तरोग झाल्याचे सांगतात व बायकोलाही तपासणीसाठी बोलवितात. त्याचप्रमाणे एच्. आय्. व्ही. ची तपासणी करण्याचा सल्ला देतात.

### बलवीर व त्याची बायको एच्. आय्. व्ही. चे बळी होतात.



एच्. आय्. व्ही हा गुप्तरोगाप्रमाणेच पसरतो. एच्. आय्. व्ही वर कोणतेही औषध नाही. परंतु योग्य काळजी घेतल्यास माणूस काही वर्षे चांगले आयुष्य जगू शकतो असे म्हणून डॉक्टर बलवीर व त्याच्या बायकोला आधार देतात.

### बाळासही धोका



बलवीरच्या गरोदर बायकोपासून त्याच्या होणाऱ्या बाळासही एच्. आय्. व्ही चा धोका आहे...

बलवीरच्या एका रात्रीच्या मजेमुळे त्याचे संपूर्ण कुटुंब अंधारात बुडाले. आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी ही वचने पाळा;
गुप्तरोग व एच्. आय्. व्ही. पासून वाचण्यासाठी निरोध हा सुरक्षित पर्याय आहे.
<u>पण आपल्या प्रामाणिक साथीदारासोबतच राहणे हाच योग्य मार्ग आहे.</u>

एच्. आय्. व्ही.विषयी शंका अथवा प्रश्न विचारण्यासाठी खालील फोनव
संपर्क करा; <u>मुक्ता हेल्पलाईन</u>
२५४६०१०२



संपर्क :१४ लँडमार्क अपार्टमेंट, बी. जे. रोड, साधू वास्वानी चौक, पुणे४११००१. फोन : ०२१ (२०) २६०५ १०३३ मेल : upliftindiaatul@gmail.com

अपलिफ्ट इंडिया असोसिएशन - स्वाभिमान द्वारा

UpLift
Enriching lives of the poor...together

वर्ष २ अंक ४ नोव्हेंबर २००७

मनोगत

# फटाके..जरा जपून!



मुलांबरोबर रहा!

फटाक्यांशी खेळू नका!

काडेपेटीने फटाक्याची

पाण्याने भरलेली बादली घराबाहेर ठेवा

छोटे व कमी आवाजाचे

वीजेच्या तारांपासून दूर व मोकळ्या मैदानावर

रात्री १० नंतर व सकाळी ६ पूर्वी फटाके वाजवू नका

# कौटुंबिक

## लहान मुलांबरोबर संवाद:

लहान मुलं सगळ्यांनाच हवीहवीशी वाटतात. आपल्या घरात अथवा शेजारी लहान मूल असेल तर त्याच्याशी खेळण्यात बोलण्यात आपला वेळ आनंदात जातो. हळूहळू मुलांच्या चौकशा वाढायला लागतात, मुलं हट्ट करायला लागतात. रोज खाऊ देणारी आई त्याला धपाटे घालायला लागते. मुलांना सांभाळणे अवघड वाटू लागते.

म्हणूनच लहान मुलांशी सुसंवाद साधणे, त्यांना शिस्त लावणे महत्त्वाचे आहे. मुलाला शिस्त लावायची म्हणजे नेमकं काय करायचं? मारायचं, रागवायचं, धाकात ठेवायचं? बालमानसशास्त्रज्ञ बक्षीस व शिक्षा पद्धतीचा योग्य वापर करून मुलांना शिस्त लावायचा सल्ला देतात. मुलांशी योग्य संवाद साधून बक्षीस व शिक्षा पद्धती कशी वापरायची ह्यासाठी खालील गोष्टींचा विचार करावा.



### मुलांना बक्षीस देताना काळजी घ्यावी

- चांगल्या गोष्टी केल्यावर जर इतरांकडून चांगला प्रतिसाद मिळाला तर मूल तीच



- मुलांचे कौतुक जरुर करावे मात्र मुलांना आधीच बक्षीसाची लालूच दाखवू नये. अन्यथा कौतुक झाले नाही तर त्यांना नैराश्य येते. तसेच बक्षीस हे वस्तूरूपात नसावे. मुलांचे लक्ष मग त्या वस्तूकडे



### शिक्षा देतानाही काळजी घ्यावी.

- मुले जेव्हा अयोग्य गोष्टी करतात जसे नव्या सोफ्यावर उडी मारणे, खेळणी तोडणे, एखाद्या वस्तूसाठी हट्ट करणे. अशावेळी नापसंती दर्शवावी. तसेच मुलांचे लक्ष दुसरीकडे वळवावे. जसे मूल सोफ्यावर उड्या मारत असेल तर त्याला संध्याकाळी बागेत जाऊ तिथे तू हिरवळीवर उड्या मार असे सांगता येईल.
- शिस्त लावताना मुलांना त्यांना समजतील असेच नियम घालावेत. ते पालन



- शिस्तीमध्ये सातत्य असले पाहिजे. कधीतरी आई रागावली आहे म्हणून छोट्या चुकीला मोठी शिक्षा तर कधी चुकांकडे दुर्लक्ष केल्यास मुलांना नेमके काय चुकते आहे तेच कळत नाही.
- मुलांना त्याच्या चुकीबद्दल शारीरिक मारहाण, जेवण देणे चटके देणे अशा शिक्षा देऊ नयेत. त्यामुळे मुलांचे वर्तन सुधारत नाहीच पण मुले आक्रमक, घाबरट अथवा लाजाळूही बनू शकतात.
- मुलांच्या चुकीची शिक्षा त्यांना लगेचच द्यावी. अन्यथा त्यांना शिक्षा कशाची आहे हेच कळणार नाही.

आपली मुले आपल्या सावलीखाली वाढत असतात. त्यामुळे आपण त्यांच्याशी

लेखन:
नेहा घाणेकर



संपर्क :१४ लँडमार्क अपार्टमेंट, बी. जे. रोड, साधू वास्वानी चौक, पुणे४११००१. फोन: ०९१ (२०) २६०५ ९५१३ ईमेल:

# आपले सरकार

## पुणे महानगर पालिकेतर्फे वस्तीवासियांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजना

स्मार्ट सेवा केंद्र :

सामन्य नागरिकांना दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक सेवा योग्य दरात व कुशल कारागिरांकडून पुरविण्यासाठी तसेच कुशल व अकुशल बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत २००० सालापासून शहरातील १४ ठिकाणी सेवा केंद्रे उभारण्यात आली आहेत.

| वैशिष्ट्ये | कोणासाठी | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न | कागदपत्रे | अर्ज मिळण्याचे व भरण्याचे ठिकाण | संपर्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| या सेवा केंद्रामार्फत नागरिकांना लागणाऱ्या दैनंदिन सेवा उदा. प्लंबिंग, वायरमन, घराचे रंगकाम, टि.व्ही. फ्रिज दुरुस्ती, गवंडीकाम, सुतारकाम, डेटा एन्ट्री, पाण्याच्या टाक्या स्वच्छ करणे, माळीकाम, कुरियर सेवा इत्यादी सेवा रास्त दरात देण्यात येतात.<br><br>नागरिकांना सेवा केंद्रावर सकाळी ९.०० ते सायं. ४.०० या वेळात फोन करुन ज्या सेवांची आवश्यकता आहे त्यांची मागणी नोंदविता येते.संबंधित नोंदीप्रमाणे कुशल कारागिरांना पाठविण्यात येते. या कारागिरांना हत्यारांचा संच, ओळखपत्र व गणवेश इ. दिले जाते.<br><br>कारागिर ठरलेल्या दराने सेवा पुरवितो व त्याची पावती देतो. मिळालेल्या रकमेपैकी ५ टक्के रक्कम सेवा केंद्राला दिली जाते. अशाप्रकारे, बेरोजगारांना रोजगार मिळतो व नागरिकांना योग्य दरात सेवा मिळते.<br><br>क्रमशः | दुर्बल घटकातील कुशल व अकुशल बेरोजगारांसाठी | १८ ते ४५ | पुणे म.न.पा. नागरवस्ती विकास योजनेमार्फत ट्रेड टेस्ट घेण्यात येते. या परिक्षेत उत्तीर्ण झाल्यास ओळखपत्र मिळते.<br><br>शिवाय इतर कुशल कारागिरांना अटींमध्ये बसत असल्यास संधी दिली जाते. | रु. ८०, ००० च्या आत | १. पुणे म.न.पा. हद्दीतील रेशनकार्ड<br><br>२. वयाचा दाखला उदा. मतदानाचे ओळखपत्र, शाळेचा दाखला इ.<br><br>३. कुशल कारागिराने एखादा अभ्यासक्रम पूर्ण केला असल्यास त्याचे सर्टिफिकेट | १. घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय - २५५१३४६७<br>२. औंध क्षेत्रिय कार्यालय - २५८९६९०१<br>३. कर्वेरोड क्षेत्रिय कार्यालय - २५४५८६८०<br>४. कसवा पेठ क्षेत्रिय कार्यालय - २४४३५४५१<br>५. ढोले पाटील रस्ता क्षेत्रिय कार्यालय - २६१४५९९३<br>६. हडपसर क्षेत्रिय कार्यालय - २६८२४३००<br>७. संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय - २६६८७७०२<br>८. विश्रामबादवाडा क्षेत्रिय कार्यालय - २४४३५४८३<br>९. सहकारनगर व विबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय - २४२३११४०<br>१०. वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय - २५४५८६८१<br>११. भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय - २६४३८१४९<br>१२. टिळक रस्ता क्षेत्रिय कार्यालय - २४४३५४९५<br>१३. धनकवडी : २४३१९९१७<br>१४ येरवडा : उपलब्ध नाही | स्मार्ट सेवा सहकारी संस्था मर्यादित संत ज्ञानेश्वर समाज मंदिर भारत टॉकिज जवळ भवानी पेठ, पुणे ४११०४२<br><br>वेळ : सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.००<br><br>लेखन :<br>विजया भोसले<br>स्नेहदीप |